## ॥ श्री ॥
## ॥ बाबा ॥

माणसाच्या पोरा उमज जरा
लेकरा उमज जरा
बाबा उमज जरा
विषयवेडा तु झालास कसा ॥धृ॥

माझे माझे करुन आयुष्य गेले, आयुष्य गेले
अंती ना कुणी सोबत आले , सोबत आले ॥1॥

गर्भात राहशी सोहंपणाने ,सोहंपणाने
आता का वावरशी अहंपणाने ,अहंपणाने ॥2॥

मोहाच्या फुलबागेत तू फसलास , लेकरा तू फसलास
आणि बाबांच्या प्रेमाला तु मुकलास ॥3॥

बाबांना पाहू नकोस देहात ,लेकरा देहात ,लेकरा देहात
साक्षात देव वावरतो आपल्यात ,लेकरा आपल्यात ॥4॥

निर्वाणीची तुझी हाक ऐकता ,लेकरा हाक ऐकता
बाबा धावत येती क्षणभरात ॥5॥

★★★★★